# प्रेसनोट

जा.क्र. १७६ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः– १०/ ०३ /२०१७

## गुन्हे आढावा बैठक/सत्कार समारंभ

भंडारा :– पोलीस मिटींग हॉल पोलीस मुख्यालय भंडारा येथे आज दि. ०९/३/२०१७ रोजी गुन्हे बैठक घेण्यात आली जिल्हयातील सर्व १७ पोलीस स्टेशन कडुन मासीक अहवाल,तसेच वार्षिक गुन्हयाचा आढावा घेण्यात आला तसेच सर्व प्रकारच्या गुन्हयाविषयी आणि पोलीस स्टेशन स्तरावरील समस्या विषयी चर्चा करण्यात आली.

तसेच नियत वयोमानानुसार पोलीस दलातुन सेवा निवृत्त झालेले स.फौ. बौध्द, स.फौ. ढेंगे, स.फौ. सिंगनजुडे हे पोलीस दलातुन सेवानिवृत्त झाले असल्याने मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु यांच्या हस्ते त्यांचे शाल, श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आले. तसेच श्रीमती धनश्री अरविंद डहाके, परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक, पोलीस शिपाई भागवत गंगाराम मुंडे, चालक पोलीस शिपाई आशिक सुर्यभान निंबार्ते पोस्टे पवनी यांनी महाराष्ट्र राज्य बसस्थानक पवनी येथे उभी असलेली ट्रॅवल्सला दिनांक २५/०२/२०१७ रोजी रात्री २.०० वा अचानक बसच्या समोरील भागात आग लागल्याने आणि गस्तीवर असतांना त्यांनी समय सुचकता दाखवुन बसस्थानकात उभ्या असलेल्या इतर बसेसला हानी न होवु देता आग आटोक्यात आणुन संबधीतांना वेळेची माहिती देवुन मोलाचे कर्तव्य पार पाडले. तसेच महिला पोलीस शिपाई सुषमा बाभरे, म.पो.शि रेखा मेश्राम पोस्टे लाखनी यांनी कलम ३६३ भांदवि मध्ये कौशल्यपूर्णरित्या अपहरित मुलास ४ तासाचे आत बसस्टॉप लाखनी येथे महिला आरोपीसह ताब्यात घेऊन उत्कृष्ठ दर्जाची कामगिरी केल्याने मा. पोलीस अधिक्षक भंडारा श्रीमती विनीता साहु यांनी त्यांचे अभिनंदन करुन आपण भविष्यात अशाच प्रकारे उत्तम व चांगली कामगिरी करित राहावी. याकरीता उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्र दिले.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.